



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784







वर्ष ३ रे अंक : २२६ वा शनिवार दि ०१ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भाजपने जुना वचपा काढला ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एका शहरात धक्का- २ माजी महापौरांसह १२ शिलेदारांच्या हाती कमळ!

जनसंचलन/बुलढाणा

जळगाव: आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जळगाव शहरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला शहरात मोठा धक्का बसला असून, सुरेश जैन यांच्या खानदेश विकास आघाडीचे माजी महापौर आणि १२ माजी नगरसेवकांनी आज सायंकाळी मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या प्रवेशामुळे जळगाव शहरात भाजपची ताकद वाढणार असून, आगामी निवडणुकीसाठी भाजपने मोठी खेळी खेळल्याची चर्चा रंगू लागली आहे. सुरेश जैन यांचे जुने सहकारी आणि निकटवर्तीय असलेल्या या नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करत असल्याने ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरेश जैन यांच्यासोबत असलेले हे नगरसेवक आता भाजपच्या वाटेवर निघाले आहेत. यापूर्वीही सुरेश जैन यांच्या गटातील काही नेते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा होती, परंतु स्थानिक भाजप कार्यकर्त्यांच्या विरोधामुळे हा प्रवेश लांबणीवर पडला होता. परंतु, आज अखेर हा प्रवेश निश्चित झाला आहे. सुरेश जैन यांच्या नेतृत्वात त्यांच्या समर्थकांनी २०१८ची निवडणूक शिवसेनेच्या चिन्हावर निवडणूक लढवली होती आणि त्यांच्या १५ निकटवर्तीयांनी विजय मिळवला होता. यातील अनेक नगरसेवक आता भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. सुरेश जैन गेल्या तीन वर्षांपासून राजकारणापासून अलिप्त असल्याने, जळगाव महानगरपालिकेत सत्ता मिळवण्यासाठी भाजपने ही रणनीती आखल्याचं बोललं जात आहे. यापूर्वी २०१८ मध्ये भाजपने जळगाव महानगरपालिकेत एकहाती सत्ता मिळवली होती. मात्र, अडीच वर्षातच कोरोना काळात भाजपच्या ३० नगरसेवकांनी बंडखोरी करत ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यामुळे भाजपची सत्ता गेली आणि शिवसेनेचा भगवा फडकला. भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये माजी महापौर नितीन लड्डा, माजी महापौर जयश्री महाजन, सुनील महाजन, शबाना बी खाटीक, हर्षा अमोल सांगोरे, नितीन बरडे, अण्णा कापसे, जाकिर पठाण, नितीन सपके, चेतन शिरसाळे, निता सोनवणे, इकबाल पिरजादे, रिता विनोद सपकाळे, फिरोज पठाण, संगीता तांडेकर, प्रशांत नाईक यांच्यासह इतर काही नगरसेवकांचा समावेश आहे. दरम्यान, एकीकडे या पक्षप्रवेशामुळे भाजपला ताकद मिळणार असली तरी भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. अनेक वर्षांपासून भाजपसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून नवीन लोकांना संधी दिली जात असल्याची भावना त्यांच्यात निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. महानगरपालिकेत पुन्हा एकहाती सत्ता मिळवण्यासाठी भाजपला सुरेश जैन यांच्या गटाला सोबत घेणे आवश्यक वाटत होतं. येत्या काळात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचेही काही माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे शिवसेनेचे नेते आणि जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील या माजी नगरसेवकांना किती सांभाळू शकतील, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.



# गुटख्याची अवैध वाहतूक; दोघांविरोधात गुन्हा दाखल

## बोराखेडी पोलिसांनी केला ४६ हजारांचा साठा जप्त

जनसंचलन/बुलडाणा

मोताळा बोराखेडी पोलिसांनी गुटख्याची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांना रंगेहात पकडत ४६ हजार ४२० रुपयांचा गुटख्याचा साठा जप्त केला आहे. ही कारवाई गुरुवारी (३१ ऑक्टोबर) सकाळी डेअरीजवळ करण्यात आली. बोराखेडी पोलिसांना दुचाकीने गुटख्याची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक आणि उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बोराखेडी ठाणेदार यांच्या देखरेखीखाली बालाजी शेंगेपल्लू, राजेंद्र कपले, अशोक आडोकार,




प्रवीण पडोळ आणि आकाश यादव यांच्या पथकाने सापळा रचला. दरम्यान, वाघजाळ येथील प्रशांत सुभाष गाडेकर आणि आकाश गणेश गाडेकर हे दोघे विना नंबरच्या इलेक्ट्रिक दुचाकीने गुटखा आणि सुगंधित तंबाखूची वाहतूक करताना आढळले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन माल जप्त केला. एकूण ४६ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी नितीन महादेवराव नवलकार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि बालाजी शेंगेपल्लू हे करीत आहेत.

# अज्ञात वाहनाची धडक; शिक्षक गंभीर जखमी

जनसंचलन/धाड

सावळी परिसरात अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात शिक्षक गंभीर जखमी झाल्याची घटना २४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली. याप्रकरणी धाड पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. चांडोळ येथील गणेश काशीनाथ माळोदे (वय ३६) हे राजर्षी शाहू कॉलेजमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. २४ ऑक्टोबर रोजी रात्री ते दुचाकीने (क्र. एम.एच.२८ ए.ए.८९२४) घरी परतत असताना सावळी शिवारातील गणपती मंदिराजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गणेश माळोदे गंभीर जखमी झाले. या घटनेनंतर त्यांना




तत्काळ बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले, जिथे त्यांच्या डोक्याचे व खांद्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, प्रकृती स्थिर असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. दरम्यान, अज्ञात वाहनचालक फरार असून, पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. तपास धाड पोलिस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

# ...खेळा शिस्तीत...

## संपादकीय लेख

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) चे राष्ट्रीय क्रीडा महासंघात येणे ही आगामी राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाची सर्वांत मोठी उपलब्धी आहे. क्रीडा क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणणे, उत्तरदायित्व लागू करणे आणि निर्णयप्रक्रियेत खेळाडूंना अधिक ठोस आवाज देणे, हे याचे उद्देश आहेत. आजपर्यंत सरकारने विविध संघटनांमधील समस्या सोडविण्यासाठी आणि संघटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी या पूर्वी तीन विधेयके आणण्याचा प्रयत्न केला होता. या विधेयकाचा पूर्वीचा मसुदा बाजूला पडला असला, तरी सन २०३६च्या ऑलिम्पिकचे भारतात आयोजन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मोदी सरकारने नवीन क्रीडा विधेयक मंजूर करण्यासाठी योग्य वेळ निवडली आहे. या वेळी क्रीडा मंत्रालयाने व्यापक दृष्टिकोन ठेवून प्रथम आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची भेट घेतली आणि त्यांना आश्वासन दिले, की ते ऑलिम्पिकची भावना आणि चार्टर नुसार काम करतील. त्यानंतर विखुरलेल्या भारतीय ऑलिम्पिक संघटनेमधील (आयओए) सर्व गटांना या तरतुदी लवकरात लवकर मान्य व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात आले. क्रीडाक्षेत्रात देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी, सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी क्रीडा व युवक मंत्रालयासाठी ३७९४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली आहे. गेल्या वर्षीच्या सुधारित अर्थसंकल्पातील ३,२३२ कोटी रुपयांपेक्षा ही मोठी वाढ आहे. सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना सरकारकडून आर्थिक मदत मिळत आहे. मंत्रालयाने हे पैसे खेळाडूंपर्यंत पोहोचतील याची खात्री केली असून कागदोपत्रीच अस्तित्व असलेल्या अनेक महासंघांवर निश्चितच काही नियंत्रण आवश्यक आहे. अनेक राष्ट्रीय महासंघांच्या पदांवर राजकीय नेते आणि नोकरशहांचे वर्चस्व आहे. आज न्यायालये आणि केंद्रीय न्यायाधिकरणांमध्ये सुमारे ७७० क्रीडा-संबंधित प्रकरणे प्रलंबित आहेत. सन २०१५पासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये विविध क्रीडा संस्थांमधील प्रशासन, निवडणुका आणि खेळाडूनिवडीसंदर्भातील वाद आहेत. यातील काही महत्त्वाची प्रकरणे उच्च न्यायालये (४६२) आणि सर्वोच्च न्यायालयात (२२) आहेत. त्यात अनेक राष्ट्रीय क्रीडा महासंघ याचिकाकर्ते किंवा प्रतिवादी म्हणून सहभागी आहेत. २००हून अधिक प्रकरणांमध्ये राष्ट्रीय क्रीडा महासंघ एक तर खटला दाखल करणारा पक्ष आहे; किंवा त्यांच्यावर खटला दाखल होत आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या ङ्ग२६/८फ निकाल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदेशांची मालिका ङ्गबेंचमार्कफ झाली आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या अनेक निवडणुका रद्द करण्यात आल्या. क्रीडा आणि युवक मंत्रालयाने २६/८ आदेशांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले, त्याच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना ही बाब कायमची संपवण्याचे आश्वासन देते; कारण त्याकडे दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. यामध्ये एक अध्यक्ष आणि इतर दोन सदस्य असतील. न्यायाधिकरणाचे प्रमुख सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश अथवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. यावरील नियुक्त्या केंद्र सरकारच्या हाती असतील; त्यात सरन्यायाधीश किंवा सरन्यायाधीशांनी शिफारस केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समिती किंवा विधी आणि न्याय मंत्रालयातील सचिव आणि क्रीडा सचिवांचा समावेश असेल. आर्थिक अनियमितता आणि सार्वजनिक हिताच्या विरुद्ध असलेल्या कृतींसह, नियमांचे उल्लंघन झाल्यास केंद्र सरकारला सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार असेल. या न्यायाधिकरणाच्या आदेशांना केवळ सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येईल; त्यामुळे खेळांशी संबंधित वादांचे निराकरण करण्यात कोणतीही कनिष्ठ न्यायालये सहभागी होणार नाही. त्याचा परिणाम वादांच्या जलद निपटाऱ्यात होईल. न्यायाधिकरणाच्या निर्णयानंतर ३० दिवसांत अपील दाखल करावे लागेल; परंतु अंतिम मुदत संपल्यानंतर ते दाखल करता येईल, का हे ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असेल. राजकीय नेते, नोकरशहा आणि व्यक्तींकडून महासंघ कायमस्वरूपी ताब्यात घेण्याच्या विरोधात, या विधेयकात विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार क्रीडा संस्थांमध्ये अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष या पदांसाठी सलग तीन टर्मची कार्यकाळ मर्यादा १२ वर्षांपर्यंत निश्चित केली आहे. आंतरराष्ट्रीय सनद आणि संबंधित खेळाच्या कायद्यांनुसार नामांकनाच्या वेळी वयोमर्यादा ७० वर्षे ठेवण्यात आली आहे, ती ७५ वर्षांपर्यंत वाढवता येऊ शकेल.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ३ दिवस आक्रमक आंदोलन, कर्जमाफीची घोषणा; पण बच्चू कडूंचा इशारा कायम

**नागपूर :** राज्य सरकारने बच्चू कडू आणि शेतकऱ्यांच्या मोठ्या आंदोलनानंतर कर्जमाफी करणार असल्याचं जाहीर केलं आहे. त्यानंतर आज बच्चू कडू यांचं नागपूरमध्ये जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी बच्चू कडूंनी जोरदार भाषण केलं. ते म्हणाले की ही लढाई तुम्ही जिंकली आहे. एकीचं बळं मोठं असतं. कष्ट केल्यानंतर यश मिळतं, असं म्हणाले आहेत. १३ महिने पंजाबचं आंदोलन चाललं. आपलं ३ दिवसं चाललं. शरद जोशी यांच्या आंदोलनानंतर ३१ वर्षांनंतर सगळ्यात मोठं आंदोलन आपण केलं आहे, असं त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

यावेळी राज्यातल्या विविध शेतकरी नेत्यांचं बच्चू कडूंनी कौतुक केलं आहे. त्यांनी 'आमचं नाव लिहिलं जातं पण यामागे सर्वांचे कष्ट आहेत, ही लढाई कार्यकर्त्यांनी जिंकली आहे, आम्हाला प्रतिष्ठा



मिळते, पण मेहनत करणाऱ्या छोट्या कार्यकर्त्यांना नाव पण मिळत नाही. कमाल आहे तुमची. मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या फौजैन ही कर्जमाफी खेचून आणली आहे', असं बच्चू कडूंनी यावेळी म्हटलं आहे.आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना या आंदोलनामुळे हिंमत मिळेल, या नेत्यांना लढताना पाहून शेतकरी खचून जाणार नाही. या आंदोलनाने शेतकऱ्याला मोठी ताकद दिली आहे.

याचा गर्व वाटावा एवढी मोठी ही गोष्ट आहे, म झ्या छातीवर गोळी झाडली तरी मागे हटणार नाही, अशा विचाराने आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या विचारांचा हा विजय आहे', असं बच्चू कडू म्हणाले.यावेळी रायगडच्या ३ दिवसांच्या आंदोलनाची पार्श्वभूमी सांगत 'छत्रपती शिवाजी महाराजांकडून शक्ती मिळाली आणि हे आंदोलन अविरतपणे सुरु राहीलं, आज यश मिळालं. आंदोलन पाहून अजित पवार कर्जमाफी देण्यास तयार झाले, तारीख न देणाऱ्या सरकारने तारीखही दिली,' असं बच्चू कडू म्हणाले आहेत.३१ जूनआधी कर्जमाफी झाल्याशिवाय राहणार नाही. यावर्षीचे कर्जबाजारी शेतकरीही या कर्जमाफीत बसले आहेत. एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी शब्द दिला आहे. दिलेला शब्द पाळला नाही, दगाफटका केला तर फासावर जाण्याची तयारी आहे', असंही रोखठोक मत बच्चू कडूंनी यावेळी व्यक्त केलं आहे.

दरम्यान, काल राज्य सरकारने बच्चू कडू यांच्या आंदोलनाची दखल घेत शेतकऱ्यांची कर्जमाफीची मागणी मान्य केली आहे. काल यासाठी नागपूरम धून बच्चू कडू सरकारशी चर्चा करण्यासाठी मुंबईत दाखल झाले होते. त्यानंतर आंदोलन करणाऱ्या नेत्यांच्या शिष्टमंडळाबरोबर जवळपास अडीच तास बैठक पार पडली. त्यानंतर रात्री उशीरा मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधत ३१ जून २०२६ पर्यंत आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी करणार असल्याची घोषणा केली आहे.

## संजय राऊतांच्या प्रकृतीत गंभीर बिघाड, नरेंद्र मोदी यांचं काळजीचं ट्विट

**मुंबई :** संजय राऊत सध्या आजारी आहेत. त्यांच्या प्रकृतीत गंभीर स्वरुपाचा बिघाड झाल्याची माहिती स्वत: राऊतांनी ट्विट करुन दिली आहे. राऊतांच्या या ट्विटनंतर अनेकांकडून त्यांनी लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना केली जात आहे. यामध्ये राजकारण बाजूला सारून माणुसकी आणि राजकीय संस्कृतीचं दर्शन घडल्याचं बघायला मिळत आहे. कारण खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संजय राऊत यांच्यासाठी ट्विट केलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट केलं आहे. 'संजय राऊत जी, तुमच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आणि तुमच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी 'एक्स'वर (द) म्हणाले आहेत.आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले, पण सध्या अचानक म




झ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचे समोर आले. मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणे आणि गर्दीत मिसळणे यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे मी ठणठणीत बरा होऊन साधारण नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीवाद असेच राहू द्या', असं ट्विट संजय राऊत यांनी केलं. त्यांचं हेच ट्विट रिट्विट करत पंतप्रधान मोदींनी राऊतांनी लवकरे बरे व्हावे यासाठी सदिच्छा दिल्या. पंतप्रधान मोदी यांच्या या ट्विटची सध्या चर्चा होऊ लागल्या आहेत.

## पुढच्या आठवड्यात निवडणुका जाहीर होणार?

**पुणे :** सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार निवडणूक आयोगाला ३१ जानेवारीच्या आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणं गरजेचं आहे. त्यामुळे निवडणुका आगामी काळात जाहीर होऊ शकतात. पण विरोधी पक्षांकडून निवडणूक आयोगाच्या विरोधात उद्या मोर्चा काढला जाणार आहे. त्यांची मतदार याद्यांमधील घोळ सुधारण्याची मागणी आहे. तोपर्यंत निवडणुका घेऊ नये, अशी त्यांची भूमि का आहे. असं असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. त्यामुळे पुढच्या आठवड्यात निवडणुकीची आचारसंहिता लागणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.बारामती तालुक्यातील सोमेश्वर येथील ६४ व्या सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगामाचा शुभारंभ अजित पवार यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी अजित पवार बोलत होते.

## फलटण डॉक्टर तरुणी आत्महत्येप्रकरणी मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश

**मुंबई :** फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या प्रकरणामध्ये एसआयटी च्या स्थापनेचे आदेश मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. राज्याचे गृहमंत्री फडणवीसांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांना हे आदेश दिले आहेत.फलटणप्रकरणी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक एसआयटी स्थापन करण्यात यावी असे हे आदेश आहेत. त्यामुळे फलटण प्रकरणात महाराष्ट्र सरकार आता ॲक्शन मोडमध्ये आलेलं पाहायला मिळत आहे.फलटण प्रकरणात पोलिसच आरोपी असल्याने पोलिसांवर, त्यांच्या तपासावर आरोप होत असल्याने महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या हातात हा तपास देण्यात येणार असल्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे आता महिला अधिकारीच या प्रकरणाचा तपास करताना पाहायला मिळणार आहेत. दरम्यान, डॉक्टर तरुणीच्या



आत्महत्येप्रकरणी विशेष तपास पथकाकडे वर्ग करण्याची मागणी अनेक राजकीय नेते, पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात होती. डॉक्टर तरुणीच्या कुटुंबाचीही तशी मागणी होती. या मागणीतून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी जोर धरुन होती. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिले आहेत.या प्रकरणात काही राजकीय व्यक्तींवरही आरोप करण्यात आले आहेत. त्यांच्याही अटकेची मागणी होत असताना आता या एसआयटी पथकाच्या स्थापनेनंतर पुढे काय घडतं याकडे सर्वांचं लक्ष असणार आहे.

# महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या हालचाली घडण्याचे संकेत, उद्याच्या मोर्चानंतर ठाकरे बंधूंची मोठी रणनीती..



**मुंबई :** मनसे आणि महाविकास आघाडीच्या पक्षांचा उद्या निवडणूक आयोगाच्या विरोधात म ुंबईत भव्य मोर्चा निघणार आहे. मतदार याद्यांम धील घोळ दुरुस्त करुनच निवडणुका घ्या, अशी मागणी महाविकास आघाडीसह मनसेच्या नेत्यांची आहे. विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने याबाबत कोणतही सकारात्मक पाऊल उचललं नाही तर मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही पक्षाचे नेते निवडणूक आयोगाच्या विरोधात कोर्टात याचिका दाखल करण्याच्या तयारीत आहेत. म नसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते पुढच्या दोन दिवसांत कोर्टात याचिका दाखल करण्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेणार असल्याची माहिती समोर येत आहेत. 'टीव्ही ९ मराठी'ने सूत्रांच्या हवाल्याने याबाबतचं वृत्त दिलं आहे. दोन्ही पक्षांचे नेते ज्येष्ठ विधितज्ज्ञांची मते जाणून घेत आहेत. त्यानंतर याबाबत योग्य निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती आहे.मनसे नेते आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांची काल मुंबईत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत १ तारखेच्या मोर्चाबाबत चर्चा करण्यात आली. या मोर्चानंतरही निवडणूक आयोगाने योग्य पावलं उचलली नाहीत किंवा आपल्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर काय करायचं? असा देखील विचार विनिमय या चर्चे त झाला. यावेळी तीन पर्यायांचा विचार करण्यात आला. पहिला पर्याय हा निवडणुकांवर बहिष्कार टाकता येईल का? असा विचार करण्यात आला. पण असा निर्णय घेतल्यास सत्ताधारी पक्षांचा फायदा होईल. त्यावर अपेक्षित अशी कारवाई होणार नाही, अशी चर्चा झाली. पण रस्त्यावर लढाई केली तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चर्चा झाली. यामुळे या मार्गाचा देखील अवलंब न करण्याचं ठरलं. यानंतर सनदशीर म्हणजेच कायदेशीर मार्गाने जाण्याचा निर्णय झाला. निवडणूक आयोगाच्या विरोधात रितसर कोर्टात याचिका दाखल करायची. या मार्गाने भूमिका म ांडायची, असा निर्णय या बैठकीत ठरल्याची चर्चा आहे. पण न्यायालयीन लढाई लढताना त्याला कालमर्यादा नाही. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ३१ जानेवारीपर्यंत घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. यामुळे निवडणूक आयोग निवडणुका थांबवणं कठीण आहे. त्यामुळे याबाबत आता काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

मनसे आणि ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या विरोधात कोर्टात याचिका दाखल केली तर त्यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पक्षाचा आणि काँग्रेस पक्षाचादेखील पाठिंबा राहणार आहे. महाविकास आघाडीचे नेते या विरोधात एकत्र न्यायालयीन लढाई लढण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

# अलिशान कारने रेकी अनब घरफोड्या, रायगड पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील उच्चभ्रू सोसायट्यांमध्ये भरदिवसा घरफोड्या करून नागरिकांना लुटणाऱ्या आंतरराज्यीय सराईत टोळीचा पर्दाफाश रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने केला आहे. आरोपी आलिशान होंडा सिटी कार वापरून परिसरात रेकी करून बंद घरे शोधत आणि दागदागिने, रोकड लंपास करत होते. पोलिसांच्या या अचूक आणि धडाकेबाज कारवाईत तिघा सराईत आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत सुमारे १५.५० लाखांचा सोन्याचा ऐवज आणि २४ जिवंत बुलेट्स जप्त करण्यात आले आहेत.गेल्या काही महिन्यांपासून रायगड जिल्ह्यातील पाली, रोहा, महाड आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये भरदिवसा घरफोड्यांच्या घटनांनी नागरिकांची झोप उडवली होती. घरफोड्या अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने होत असल्याने पोलिसांना सुरुवातीपासूनच आंतरराज्यीय टोळीचा संशय होता. आरोपी आलिशान गाड्यांमधून येत, परिसरात रेकी करून घरांवर लक्ष ठेवत आणि योग्य संधी मिळताच



चोरी करत.या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक ऑचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, आणि एलसीबीचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन स्वतंत्र तपास पथके तयार करण्यात आली. पथकांनी सातारा, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात सातत्याने माहिती गोळा केली.३ ऑगस्ट २०२५ रोजी माणगाव परिसरात आलिशान होंडा सिटी कार फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तातडीने नाकाबंदी करण्यात आली. मात्र आरोपींनी पोलिसांना चकवा देत नाकाबंदी फोडली आणि पसार झाले. तरीही तपास थांबला नाही. वाहनाचा मागोवा घेत रायगड पोलिसांनी आरोपींचा ठावठिकाणा सिकंदराबाद, उत्तरप्रदेश येथे शोधला. सपोनि भास्कर जाधव आणि मानसिंग पाटील यांच्या नेतृत्वाखाली ४० अंमलदार आणि ५ अधिकारी असलेल्या विशेष पथकाने उत्तरप्रदेश पोलिसांच्या मदतीने सिकंदराबाद येथील बकर कसाब मोहल्ल्यात शस्त्रसज्ज छापा टाकला. तणावपूर्ण कारवाईत पोलिसांनी शाहनवाज इकराम कुरेशी (५०), त्याची पत्नी हिना शाहनवाज कुरेशी (४५) आणि साथीदार शमीम इस्लाम कुरेशी (४२) यांना ताब्यात घेतले.मुख्य सूत्रधार शाहनवाज कुरेशी हा अट्टल गुन्हेगार असून त्याच्यावर उत्तरप्रदेश, हरियाणा आणि दिल्ली राज्यांमध्ये ३० पेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. ज्यात खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, शस्त्र कायदा, अंमली पदार्थ कायदा आदी गुन्ह्यांचा समावेश आहे. तो अटक झाल्यानंतर आजारी असल्याचे नाटक करून पोलिसांना फसवत असे आणि रिकव्हरी टाळण्यासाठी खोटे आरोप करत असे.पोलिसांच्या तपासात आरोपींकडून १५,५०,००० किंमतीचे सोन्याचे दागिने आणि २४ जिवंत बुलेट्स जप्त करण्यात आले. आरोपींनी रायगड, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील १० घरफोड्यांची कबुली दिली आहे. त्यांचे आणखी काही साथीदार फरार असून, पोलिसांचा तपास सुरू आहे. चोरी केलेल्या इतर वस्तू आणि रोकड जप्त करण्यासाठी पोलिस पथक उत्तरप्रदेशात पुन्हा रवाना झाले आहे.

पोलिसांच्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला असून, दीर्घकाळ त्रास देणाऱ्या टोळीचा अखेर अंत झाला आहे. या कारवाईचे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक श्रीमती ऑचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, आणि पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे (एलसीबी रायगड) यांनी केले. कारवाई पथकात सपोनि भास्कर जाधव, सपोनि मानसिंग पाटील, पोसई लिंगप्पा सरगर व रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता.

## १० वर्षांची बालिका, ७० वर्षीय वृद्ध; आईने फक्त पैशांसाठी.. सगळेच संतप्त

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील तळोजा परिसरात मानवी नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. या घटनेने अख्खा महाराष्ट्र हादरुन गेला आहे. शरिरसुखासाठी एका १० वर्षीय अल्पवयीन मुलीचा बाजार स्वतः तिच्या आईने मांडल्याचा किळसवाणा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा तपास करणारे अधिकारी या प्रकारामुळे संतप्त झाले आहेत.नवी मुंबईतील तळोजा फेज २ मधून ही धक्कादायक घटना उघडकीस आली असून, अनेकांची तळपायाची आग मस्तकात गेली आहे.नवी मुंबईतील कोपरा गावातील राहणारी नूरबी अन्सारी नावाच्या महिलेने आपल्या १० वर्षीय अल्पवयीन मुलीला केवळ पैशांसाठी एका अनोळखी व्यक्ती सोबत पाठवल्याचे समोर आले आहे.घटनेतील आरोपी मूळ राहणार लंडन ७० वर्षीय फारुख शेख हा तळोजा फेज २ मधील एकता डेव्हलपर्स सेक्टर २० मधील रूम ३० प्लॉट २३ राहण्यास होता. त्याच्याकडे नवी मुंबई खारघर कोपरा गावातील नूरबी अन्सारी हिने तिच्या १० वर्षीय अल्पवयीन मुलीला मागील दोन दिवस रात्री पाठविले. या बदल्यात तिने फारुख शेख कडून अडीच लाख आणि महिन्याचे घरातील रेशन भरून घेण्याचा सौदा केला.याबाबत एका गुप्त माहितीद्वारे नवी मुंबईतील अनैतिक मानवी वाहतूक पथकाला माहिती मिळाली. यानंतर पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे आणि त्यांच्या टीमने संबंधित ठिकाणी छापा मारला आणि मुलीला आरोपी फारुख शेख याला ताब्यात घेतले. यावेळी केलेल्या चौकशीत धोकादायक घटना समोर आली. पीडित १० वर्षीय अल्पवयीन मुलीच्या आईनेच आरोपी कडून पैसे आणि रेशन घेऊन तिला त्याच्यासोबत पाठविले असल्याचे उघडकीस आले.ही महिला रोज रात्री स्वतः मुलीला घेऊन जाऊन सकाळी तिला आणायला जात असे.

## तुरुंगातून बाहेर येताच गुन्हेगाराला उडवल!

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या जामा मस्जिद परिसरात शुक्रवारी सकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने राजधानी हादरली आहे. एका २२ वर्षीय तरुणाची अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडून हत्या केली आहे. प्राथमिक तपासानुसार ही हत्या गँग वॉरशी संबंधित असल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

ही घटना गुरुवारी (३० ऑक्टोबर) रात्री सुमारे १०.४० वाजण्याच्या सुमारास घडली. काही स्थानिक नागरिकांना जामा मस्जिद परिसरात एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. त्यांनी तत्काळ सीलामपूर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन त्या व्यक्तीला जग प्रवेश चंद्र रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.मृत व्यक्तीची ओळख मिस्बा अशी झाली असून, तो जफरबाद गल्ली परिसरात राहत होता. पोलिसांच्या तपासात समोर आले आहे की मिस्बा स्वतःही गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला होता आणि त्याच्यावर हत्या, खुनाचा प्रयत्न, दरोडा आणि आर्म्स ॲक्टखाली मिळून किमान सात गुन्हे नोंदवलेले होते. तो हाशिम बाबा गँगशी संबंधित असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळावरून पुरावे गोळा केले असून, किमान २० रिकाम्या कारतुसांच्या खोल्या तिथून सापडल्या आहेत.

घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून चौकशी सुरू केली आहे. 'या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी अनेक पथके तयार




करण्यात आली आहेत,' असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.त्यांनी पुढे सांगितले की, या हत्येमागे गँग वॉरचा स्पष्ट संदर्भ दिसत असून, सर्व शक्य कोनातून तपास सुरू आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे तसेच स्थानिक सूत्रांकडूनही माहिती घेतली जात आहे. स्थानिक गँगमधील वैर व इतर कोनही तपासात विचारात घेतले जात आहेत, असे त्या अधिकाऱ्याने सांगितले. सध्या संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण असून, पोलिसांनी जामा मस्जिद व सीलामपूर परिसरात सुरक्षा वाढवली आहे. या हत्येमुळे पुन्हा एकदा दिल्लीतील गँगवॉरचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

# कोल्हापुरात थरारक धाड, जनावरांच्या गोठ्यात काळा धंदा, १०० ची नोट सेम टू सेम छापायचे, पोलिसांना खबर अनब खेळ खल्लास!

**कोल्हापूर :** कोल्हापुरात शिरोळ तालुक्यात पोलिसांनी एक मोठं बनावट नोटांचं रॅकेट उघडकीस आणलं आहे. बनावट नोटांच्या रॅकेटवर जयसिंगपूर उपविभागीय पोलिसांनी धाड टाकून तब्बल ६८ हजार ४०० रुपयांच्या बनावट नोटा, प्रिंटर आणि छपाई साहित्यासह तिघांना अटक केली आहे. ही कारवाई उदगाव गावातील चिंचवाड रोडवरील जनावरांच्या गोठ्यात करण्यात आली. बनावट नोटांच्या रॅकेट प्रकरणी इचलकरंजी आणि दानोळीतील तरुणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जयसिंगपूर पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्री जनावरांच्या गोठ्यावर छापा टाकला. यामध्ये साहिल रफिक मुलाणी (वय २६,




रा. उदगाव, शिरोळ), ओंकार बाबूलाल तोवार (रा. इचलकरंजी, ता. हातकणंगले सध्या रा. दानोळी ता. शिरोळ) आणि अविनाश संतराम पाटील (वय २९, रा जुना चंदुर रोड, बरगेमळा इचलकरंजी ता. हातकणंगले) अशी आरोपींची नावे आहेत. या कारवाईत आरोपींकडून बनावट १०० रुपयांच्या ६८४ नोटा, छपाईसाठी वापरलेला एचपी कंपनीचा स्मार्ट टँक ५२५ मॉडेलचा प्रिंटर, प्रिंटरच्या कॅटरिज कटर, टेप अशी विविध तांत्रिक साहित्य जप्त करण्यात आले आहे. तर अधिकृत नोटेच्या आयकार्ड सिरीयल प्रमाणे नक्कल तयार केल्याचे देखील पोलिसांना आढळले आहे.उदगांव गावत असणाऱ्या बसवेश्वर नगर येथील बरगेमळा येथील साहील मुलाणी यांच्या जनावरांच्या गोठ्यात बनावट नोटांचे रॅकेट चालवले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार याबाबत माहिती मिळताच दिनांक ३० ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास तात्काळ पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन कारवाई केली. यावेळी तीन संशयितांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये इचलकरंजी, दानोळी आणि उदगाव येथील तरुणांचा समावेश आहे. प्राथमिक चौकशीत या रॅकेटचा सूत्रधार स्थानिक ग्रुप असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. तर आणखी काही व्यक्ती या रॅकेटमध्ये सामील असल्याचा संशय पोलिसांकडून वर्तविण्यात आला आहे.

# भारताचा 17 वर्षांचा विजय रथ कांगारुंनी रोखला

# रोमांचक सामन्यात ऑस्ट्रेलियाचा विजय

**मेलबर्न :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टी-२० सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेतील दुसरा टी-२० सामना आता मेलबर्नच्या मैदानावर सुरु आहे. पहिला सामना पावसामुळे रद्द झाला. दुसऱ्या सामन्याचे नाणेफेक हे ऑस्ट्रेलियाने जिंकले आणि प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. भारताने प्रथम फलंदाजी करताना विशेष धावसंख्येचा डोंगर उभारला नाही. केवळ १२५ धावांवर संघ ऑलआऊट झाला. ऑस्ट्रेलियाने सहज १२६ धावांचे लक्ष्य सहज गाठले आणि सामना ४ विकेट्सने जिंकला.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० मालिकेतील दुसरा सामना मेलबर्न येथे खेळवण्यात आला. ऑस्ट्रेलियन संघाने हा सामना मोठ्या सहजतेने जिंकला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील पहिला सामना रद्द झाल्यामुळे, हा सामना दोन्ही संघांसाठी फायदा मिळवण्याची चांगली संधी होती, परंतु टीम इंडिया या संधीचे सोने करण्यात अपयशी ठरली. आता, जर भारताला ही मालिका जिंकायची असेल, तर त्यांना आगामी



तिन्ही सामने जिंकावे लागतील. भारताने या सामन्यासाठी संघात एकही बदल केला नाही. ऑस्ट्रेलियाने मात्र संघात एक मात्र बदल केला होता. संघात मॅथ्यू शॉटला सामील केले गेले आणि जॉश फिलीपला संघातून बाहेर केले. सर्व भारतीय फलंदाज सतत बाद होत असताना, अभिषेकने आपली भूमिका कायम ठेवली. त्याने भारतीय संघाला सहा षटकांत ४० धावा गाठण्यास मदत केली, त्यापैकी २५ धावा एकट्याने केल्या. ४९ धावांत पाच विकेट गमावल्यानंतर भारत अडचणीत असताना, अभिषेकने हर्षित राणासोबत संघाला १०० धावसंख्या ओलांडून दिली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी केली. १६ व्या षटकात हर्षितला झेवियर बार्टलेटने त्याला बाद केले. यानंतर, ३.२ षटकांत भारतीय डाव १२५ धावांवर घसरला. मिशेल ओवेन आणि मॅथ्यू कुहनेमन व्यतिरिक्त, ऑस्ट्रेलियाच्या इतर चार गोलंदाजांनी विकेट घेतल्या.या सामन्यापूर्वी, भारतीय क्रिकेट संघाने मेलबर्नमधील ऐतिहासिक एमसीजी येथे एकूण सहा टी-२० सामने खेळले होते. टीम इंडियाने त्यापैकी चार सामने जिंकले होते आणि या ठिकाणी फक्त एकच सामना गमावला होता. हा पराभव २००८ मध्ये झाला होता. तेव्हापासून, भारतीय संघाने एकही सामना गमावलेला नाही आणि त्यातील प्रत्येक सामना जिंकला आहे. १७ वर्षांनंतर, भारतीय संघाची विजयी मालिका आता थांबली.

## भारताविरुद्धचा पराभवान ऑस्ट्रेलियन कर्णधार खचली

**नवी मुंबई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात काल सेमी फायनलचा थरार रंगला. महिला विश्वचषकाच्या फायनलच्या सामन्यात दक्षिण आफ्रिका आणि भारत यांच्यात रंगणार आहे. डी वाय पाटील स्टेडियममध्ये फायनलचा थरार पाहायला मिळणार आहे. ऑस्ट्रेलियाच्या हातचा सामना हिसकावून भारताने थाटामाटात फायनलमध्ये एन्ट्री घेतली.

२०२५ च्या महिला विश्वचषकात भारताकडून झालेल्या उपांत्य फेरीच्या पराभवानंतर ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने तिच्या एकदिवसीय भविष्याबद्दल एक मोठा संकेत दिला आहे. 'मी २०२९ मध्ये होणाऱ्या पुढील विश्वचषकात खेळणार नसल्याचे सांगितले.' गुरुवारी नवी मुंबई येथे झालेल्या या महत्त्वाच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारताकडून पराभव झाला. हीलीने स्वतः कबूल केले की, 'संघाने चुका केल्या ज्यामुळे पराभव झाला.'

पुढील विश्वचषकाबद्दल विचारले असता, एलिसा हिली म्हणाली, 'मी तिथे नसेन! काही वर्षांत संघात बदल दिसतील. पुढील वर्षी होणारा टी-२० विश्वचषक संघासाठी एक रोमांचक असेल. माझ्या संघाने या सामन्यात खूप चांगल्या गोष्टी केल्या, परंतु त्यांना पराभव पत्करावा लागला. या पराभवातून शिकतील आणि पुढे जातील.' २०२९ मध्ये हिली ३९ वर्षांची होईल. तिच्या दुखापतींचा इतिहास आणि खेळाची वाढती तीव्रता पाहता, पुढील काही वर्षांत ती क्रिकेटमधून निवृत्त होण्याची अपेक्षा आहे.हिली सामन्यानंतर म्हणाली, 'शेवटी, हा एक चांगला सामना होता.




आता मी त्याबद्दल विचार करते तेव्हा मला असे वाटते की आपण स्वतःच हा पराभव घडवून आणला. कदाचित मला असे पहिल्यांदाच वाटले असेल. आम्ही शेवटी चांगली फलंदाजी केली नाही, आमची गोलंदाजी चांगली नव्हती आणि मैदानात काही झेल सोडले गेले. पण शेवटी, आम्ही हरलो. मला वाटते की संपूर्ण स्पर्धेत सर्वांनी खूप चांगले योगदान दिले. म्हणूनच येथे उभे राहणे खूप निराशाजनक आहे.'

हिलीने स्पष्ट केले की, 'संघाने संधी निर्माण केल्या, दबाव आणला. परंतु त्याचा फायदा घेण्यात अपयशी ठरले. ' ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ३३८ धावांचा मोठा आकडा गाठला. ही धावसंख्या देखील कमी वाटत होती, विशेषतः संघाने ज्या पद्धतीने सुरुवात केली ते लक्षात घेता. दुसऱ्या डावात, अनेक क्षेत्ररक्षकांनी सोपे झेल सोडले, ज्यात हीलीचाही समावेश होता. संघाकडे चांगली गोलंदाजी असूनही सातत्याने दबाव निर्माण करण्यात अपयशी ठरला.

## प्रो कबड्डी लीगचं जेतेपद दिल्लीकडे

### दबंग दिल्ली PKL चॅम्पियन! पुणेरी पलटनची झुंज व्यर्थ




**नवी मुंबई :** प्रो कबड्डी लीग २०२५ चा शिखर सामना थरारक आणि तुफानी रंगला! दबंग दिल्ली के.सी. आणि पुणेरी पलटन यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात दिल्लीने ३१-२८ अशी नजीकची आघाडी घेत दुसऱ्यांदा जेतेपद पटकावले. त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या रोमांचक फायनलमध्ये दोन्ही संघांनी अप्रतिम खेळ सादर केला. दबंग दिल्लीकडून नीरज नरवालने दमदार प्रदर्शन करत सर्वाधिक ९ गुणांची कमाई केली, तर अजिंक्य पवारनेही ६ गुणांची भर घातली. पुणेरी पलटनकडून आदित्य शिंदेने आपलं सुपर १० पूर्ण करत संघाला शेवटपर्यंत लढवले, मात्र शेवटच्या क्षणी दिल्लीने सामना पलटवला आणि विजेतेपद आपल्या नावावर केलं.

सामन्याची सुरुवातच चुरशीची झाली. पलटनचा कर्णधार अस्लम इनामदार पहिली चढाई करण्यासाठी मैदानात उतरला आणि बोनस घेऊन संघाला दमदार सुरुवात दिली. दिल्लीकडून आशू मलिकची पहिली रेड थोडी धोकादायक ठरली पण पंचांनी त्याला 'सेफ' घोषित केलं. यानंतर दोन्ही संघांमध्ये गुणांची सतत अदलाबदल सुरू होती.

सामन्याच्या पहिल्या पाच मिनिटांत दिल्लीने ६-४ अशी आघाडी घेतली. त्यानंतर पुणेरी पलटनने डू-ऑर-डाय रेडमध्ये पंकज मोहितेच्या शानदार खेळीमुळे अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र १३ व्या मिनिटाला पलटनने केलेल्या तिसऱ्या सुपर टॅकलनंतरही दिल्लीने पलटवार करत पुण्याला ऑलआऊट केले आणि १४-८ अशी महत्त्वाची आघाडी घेतली.

पहिल्या अर्ध्यानंतर दिल्ली २०-१४ अशा फरकाने पुढे होती. दुसऱ्या अर्ध्यात पुणेरी पलटनने पुनरागमन करण्याचा पूर्ण प्रयत्न केला, पण दिल्लीच्या बचावाने भक्कम भिंत उभी केली. नीरज नरवाल आणि विशाल भरद्वाज यांनी निर्णायक क्षणी केलेल्या पकडींमुळे दिल्लीने आपली पकड घट्ट ठेवली.

सामन्यातील शेवटच्या ५ मिनिटांत दिल्ली २७-२० अशी आघाडीवर होती. पुणेरी पलटनने शेवटच्या मिनिटांत जबरदस्त प्रयत्न केला, आदित्य शिंदेने दोन गुण घेत संघाला पुन्हा शर्यतीत आणले आणि फरक फक्त २ गुणांवर आणला. पण शेवटच्या क्षणी दबंग दिल्लीने रणनीती बदलत पलटनचा शेवटचा हल्ला परतवला आणि सामना ३१-२८ ने जिंकला.

# बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती बिघडली; ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

**मुंबई :** बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या प्रकृतीबाबत एक चिंताजनक बातमी समोर आली आहे. वयाच्या ८८व्या वर्षात प्रवेश केलेले धर्मेंद्र यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्यांची प्रकृती स्थिर असून, ही केवळ नियमित तपासणीचा भाग असल्याचं कुटुंबीयांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

कुटुंबातील सूत्रांनी सांगितलं की, 'धर्मेंद्र यांच्या आरोग्यात कोणतीही गंभीर अडचण नाही. वयाचा विचार करता डॉक्टरांनी केवळ तपासणी आणि विश्रांतीसाठी त्यांना रुग्णालयात दाखल राहण्याचा सल्ला दिला आहे.' त्यामुळे चाहत्यांनी काळजी करण्याचं काहीच कारण नसल्याचंही सांगण्यात आलं आहे. धर्मेंद्र यांच्या प्रकृतीबाबतची बातमी समोर आल्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्या चाहत्यांकडून 'गेट वेल सून'च्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. काही जणांनी त्यांच्या जुन्या चित्रपटातील दृश्ये शेअर करत 'ही-मॅन लवकर परत येईल' असं लिहिलं आहे.

अलीकडेच धर्मेंद्र आपल्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान दिसले होते. दिग्दर्शक श्रीराम



राघवन यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणाऱ्या 'इक्कीस' या चित्रपटात धर्मेंद्र हे अभिनेता अगस्त्य नंदाचे आजोबा साकारताना दिसणार आहेत. हा चित्रपट पॅराम व्हिर चक्र विजेते अरुण क्षेत्रपाल यांच्या आयुष्यावर आधारित असून यात धर्मेंद्र यांचं महत्त्वाचं आणि भावनिक पात्र आहे. धर्मेंद्र यांनी १९६०च्या दशकात बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आणि 'शोले', 'चुपके चुपके', 'सीता और गीता', 'अनपढ़', 'धर्मवीर', 'ड्रीम गर्ल' यांसारखे अनेक सुपरहिट चित्रपट दिले. त्यांची जोडी हेमा मालिनीसोबत विशेष गाजली. त्यांच्या ॲक्शन आणि रोमँटिक भूमिकांमुळे त्यांना 'ही-मॅन ऑफ बॉलिवूड' ही उपाधी मिळाली. धर्मेंद्र हे फक्त एक यशस्वी अभिनेता नाहीत, तर एक संवेदनशील माणूस म्हणूनही ओळखले जातात. आजही ते सोशल मीडियावर सक्रिय राहून आपल्या चाहत्यांशी संवाद साधतात. काही दिवसांपूर्वी त्यांनी आपल्या शेतातील फोटो शेअर करत ङ्कनिसर्गात राहणं हीच खरी शांती आहे, असं कॅप्शन दिलं होतं.

दरम्यान, धर्मेंद्र यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबाकडून अद्याप अधिकृत निवेदन आलेलं नाही. मात्र, जवळच्या सूत्रांच्या मते, त्यांची स्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून पुढील एक-दोन दिवसांत त्यांना घरी सोडण्याची शक्यता आहे. सध्या संपूर्ण चित्रपटसृष्टी आणि चाहत्यांकडून त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. धर्मेंद्र पुन्हा एकदा जोशात मोठ्या पडद्यावर दिसावेत, अशीच सर्वांची इच्छा आहे.

### धर्मेंद्र सध्या कोणत्या चित्रपटात दिसणार आहेत?

ते लवकरच दिग्दर्शक श्रीराम राघवन यांच्या 'इक्कीस' या चित्रपटात दिसणार आहेत. या चित्रपटात ते अभिनेता अगस्त्य नंदाचे आजोबा साकारतील.

### धर्मेंद्र यांना काय झालं?

धर्मेंद्र यांची प्रकृती थोडीशी खालावल्याने त्यांना खबरदारीचा उपाय म्हणून ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. डॉक्टरांच्या मते ही फक्त नियमित तपासणी असून गंभीर काही नाही.

### सध्याची प्रकृती कशी आहे?

कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, धर्मेंद्र यांची तब्येत स्थिर आहे आणि त्यांना लवकरच डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्या प्रकृतीत कोणतीही गंभीर समस्या नाही.

# कपड्यावर आणि हातातही महाराज!

## पृथ्विक प्रतापच्या घड्याळाने वेधलं लक्ष




**मुंबई :** महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधून घराघरात पोहोचलेला अभिनेता पृथ्विक प्रताप 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सिनेमात पृथ्विकने महत्त्वाची भूमिका साकारली आहे. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' सिनेमातून शेतकरी आत्महत्यासारख्या विषयावर भाष्य करण्यात आलं आहे. या सिनेमाच्या निमित्ताने पृथ्विकने खास लूक केला होता. याचे फोटो त्याने सोशल मीडियावरुन शेअर केले आहेत.

फोटोमध्ये पृथ्विकने पांढऱ्याया रंगाचा कुर्ता पायजमा घातल्याचं दिसत आहे. त्याच्या कपड्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा आहे. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' सिनेमासाठी हा खास कुर्ता पृथ्विकने डिझाइन करून घेतला आहे. पण लक्ष वेधून घेतलंय ते त्याने हातात घातलेल्या घड्याळाने. पृथ्विकने घातलेलं हे घड्याळ खूप खास आहे. या घड्याळाची डाय ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोची आहे. पृथ्विकने घातलेलं हे घड्याळ 'जयपूर वॉच कंपनी'चं आहे. याची किंमत तब्बल ६५ हजार रुपये इतकी आहे. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' रयतेच्या राजाचा सिनेमा आजपासून रयतेला समर्पित. शेवटच्या श्वासांपर्यंत माझ्या राजांना छातीवर सुद्धा मिरवणार! आणि त्यांचे विचार आचरणात सुद्धा आणणार. छत्रपती शिवाजी महाराज की जय! हर हर महादेव', असं कॅप्शन पृथ्विकने या फोटोंना दिलं आहे. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा सिनेमा महेश मांजरेकरांनी दिग्दर्शित केला आहे. या सिनेमात सिद्धार्थ बोडके, सिद्धार्थ जाधव, त्रिशा ठोसर, मंगेश देसाई हे कलाकार आहेत.

# सुशांतसिंह राजपूत प्रकरणात नवा दावा!

**मुंबई :** १४ जून २०२० रोजी सुशांतसिंह राजपूत मुंबईतील बांद्यातील घरात मृतावस्थेत आढळला. या घटनेला आत्महत्या म्हणून घोषित करण्यात आलं, पण त्यानंतर त्याच्या चाहत्यांनी आणि कुटुंबियांनी या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले. पाच वर्षांनंतरही कोणताही ठोस निष्कर्ष समोर आलेला नाही. दरम्यान, रिया चक्रवर्तीला काही दिवसांपूर्वी क्लीन चिट मिळाल्याचं समोर आलं. रियावर सुशांतला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप होता.

सुशांतची बहीण श्वेता सिंह कीर्ती हिने पत्रकार शुभांकर मिश्राला दिलेल्या मुलाखतीत अनेक मोठे खुलासे केले. ती म्हणाली 'आम्हाला अजिबात विश्वास बसत नाही की सुशांतनं आत्महत्या केली. तो पंख्यावर कसा काय लटकू शकेल?



कारण पंखा आणि बेडमध्ये खूपच कमी अंतर होतं. त्याशिवाय तिथं स्टूल नव्हतं. मग आत्महत्येचा प्रश्नच येत नाही.' श्वेतानं पुढे सांगितलं 'सुशांतच्या मानेवरचे व्रण हे कपड्याचे किंवा ओढणीचे नव्हते. ते काहीतरी वेगळे, जणू एखाद्याने गळा आवळल्यासारखे व्रण होते. आम्ही फॉरेन्सिक अहवाल पाहिल्यानंतरही हेच जाणवलं की, ही आत्महत्या नव्हती. आमचं मन अजूनही सांगतं त्याचा खून झाला आहे.' ती पुढे म्हणाली 'मी भारतातील आणि अमेरिकेतील दोन मानसशास्त्रज्ञांशी बोलले. दोघांनीही मला सांगितलं की सुशांतचा मृत्यू नैसर्गिक नाही. त्यांनी स्पष्ट म्हटलं 'ही आत्महत्या नव्हे, मर्डर आहे.' आमच्याकडे काही संकेत आहेत की त्याला मारण्यासाठी दोन लोक आले होते.' श्वेतानं सीबीआयच्या तपासावरही नाराजी व्यक्त केली. 'आम्ही खूप प्रयत्न करून प्रकरण सीबीआयकडे दिलं. आम्हाला त्यांच्यावर विश्वास होता. पण इतक्या वर्षांनंतरही काही निष्कर्ष का लागले नाहीत? नेमकं असं काय घडलंय की कोणालाच सत्य सांगता येत नाही?' ती म्हणाली की, अनेक लोक तिच्याशी नंतर भेटले, काही कलाकारही भेटले, आणि सर्वांना एकच प्रश्न होता 'शांतसारखा सकारात्मक आणि बुद्धिमान व्यक्ती स्वतःचा जीव का घेईल?'

# सिद्धार्थला छत्रपतींच्या भूमिकेत पाहून भावूक झाली पत्नी तितिक्षा

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीतील बहुप्रतिक्षित सिनेमा 'पुन्हा शिवाजीराजे भोसले बोलतोय' ३१ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांकडून या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महेश मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटातून शेतकरी आत्महत्यांचा गंभीर मुद्दा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारधारेचा गाभा प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची वेदना, मराठी माणसाच्या संघर्षाची कहाणी आणि समाजाला विचार करायला लावणारा संदेश या चित्रपटातून दिला आहे.

या चित्रपटात अभिनेता सिद्धार्थ बोडके पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराजांच्या भुमिकेत झळकला आहे. छोट्या पडद्यावर मालिकांमधून लोकप्रिय झालेल्या सिद्धार्थने मोठ्या पडद्यावर या भूमिकेत आपली ताकद दाखवून दिली आहे. महाराजांच्या रूपातील सिद्धार्थला पाहून प्रेक्षकांसह त्याची पत्नी अभिनेत्री तितिक्षा तावडे हिलाही भावनांचा पूर आला.



चित्रपटाच्या प्रीमिअरला तितिक्षा उपस्थित होती. चित्रपट संपल्यानंतर थिएटरच्या बाहेर आल्यानंतर तिने नवऱ्याला मिठी मारत अश्रू ढाळले. सिद्धार्थच्या अभिनयाचा आणि त्याच्या मेहनतीचा अभिमान वाटल्यामुळे तितिक्षा काही क्षण स्वतःला सावरू शकली नाही. हा भावनिक क्षण कॅमेऱ्यात कैद झाला असून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जनसंचलन/बुलढाणा**

भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आणि दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या ४१ व्या स्मृतिदिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जिल्ह्याचे पालक सचिव शैला ए., जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा नाझर मोतेकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सामाजिक बांधिलकी समजून शासकीय योजना राबवाव्यात - पालक सचिव शैला ए.

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना सामाजिक बांधिलकी समजून प्रभावीपणे राबवाव्यात, अशा सूचना वित्त विभागाच्या सचिव तथा जिल्ह्याच्या पालक सचिव शैला ए. यांनी आज अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्याच्या पालक सचिव झाल्यानंतर त्या शुक्रवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या होत्या. या दौऱ्यात त्यांनी विविध विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांकडून जिल्हास्तरीय आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, मुख्य वनसंरक्षक सरोज गवस, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, डॉ. जयश्री ठाकरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे यांचे सह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचा परिचय करून दिला त्यानंतर आढावा बैठकीला सुरुवात करण्यात आली. या बैठकीत पालक सचिव शैला ए यांनी जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक क्षेत्राची माहिती घेतली. त्यानंतर जिल्ह्याची लोकसंख्या, विकास प्रकल्प, पर्यटनस्थळे, मुलींचा जन्मदर, शिक्षण, आरोग्य, पर्जन्यमान, अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे शेत नुकसान, पंचनामे आणि अनुदान वाटपायाची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील पीक- पेरणी क्षेत्र, फळ पिकांचे क्षेत्र, अन्न प्रक्रिया उद्योग वृक्ष लागवड, फळबाग लागवड, प्रधानमंत्री पीक विमा योजना, फळ पिक विमा योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्जपुरवठा, पिककर्ज वाटप, कृषी पतपुरवठा, सावकारी कर्ज वाटप, अॅग्रीस्टॅक, पीएम किसान निधी, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, समाधान शिबीर, लोकशाही दिन, जिवंत सातबारा मोहीम, सेवा पंधरवडा अंतर्गत सर्वांसाठी घरे अभियान, पाणंद रस्ते, मनरेगा, प्रधानमंत्री आवास योजना, राज्य पुरस्कृत आवास योजना, जलजीवन मिशन, आयुष्मान भारत, अंत्योदय अन्न योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, जिल्हा वार्षिक नियोजन आराखडा, सिंचन प्रकल्प, भूसंपादन व पुनर्वसन, तीर्थक्षेत्र विकास आराखडा, लोणार सरोवर विकासाचा आराखडा आणि आगामी प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला. आढावा घेतल्यानंतर पालक सचिव शैला ए यांनी मार्गदर्शन करताना प्रशासनाने चांगल्या पद्धतीने काम करावे, सर्व विभागांनी समन्वयाने शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सादरीकरणाद्वारे बुलढाणा जिल्ह्याची माहिती सादर केली.

# अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा जिल्हा दौरा



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य धर्मपाल मेश्राम हे दि.४ नोहेंबर २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे. सकाळी १०.३० वाजता बुलढाणा शासकीय विश्रामगृह येथे आगमन व आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद येथील सभागृहामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसोबत जिल्हा परिषदकडे प्राप्त होणाऱ्या महसूलाचे एकूण ५ टक्के निधी आस्थापना, वजा खर्च, आर्थिक दुर्बल घटकावर केलेल्या खर्चाची मागील ५ वर्षाचा आढावा व कामाची तपासणी अनुसूचित जाती साठी प्राप्त होणारा निधी बाबत अढावा व तपासणी. दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी बुलढाणा येथील सभागृह हॉलमध्ये जिल्हाधिकारी भंडारा यांचे सोबत संविधान-०५ निधी बाबत आढावा बैठक. दुपारी १ वाजता नगरपरिषद येथील सभागृह हॉलमध्ये नगर परिषद मुख्याधिकारी यांचे सोबत नगरपरिषदकडे प्राप्त होणाऱ्या महसूलाचे एकूण ५ टक्के निधी आस्थापना, वजा खर्च, आर्थिक दुर्बल घटकावर केलेल्या खर्चाची मागील ५ वर्षाचा आढावा व कामाची तपासणी तसेच नागरी दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना व लाड पागे प्रलंबित प्रकरणे व अनुकंपा तत्वावरील प्रकरणे तसेच अनुसूचित जाती साठी प्राप्त होणारा निधीबाबत अढावा व तपासणी. दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे राखीव. दुपारी २.३० वाजता पोलीस अधीक्षक यांचे अंतर्गत लाड पागे समितीच्या नियुक्ती संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणाबाबत आढावा बैठक. दुपारी ३ वाजता आरोग्य अधिकारी यांचे अंतर्गत लाड पागे समितीच्या नियुक्ती संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणाबाबत आढावा बैठक. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अंतर्गत लाड पागे समितीच्या नियुक्ती संदर्भातील सर्व प्रलंबित प्रकरणाबाबत आढावा, दुपारी ४ वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे जिल्हा क्रिडा अधिकारी बुलढाणा यांचे सोबत आढावा बैठक, सायंकाळी ५ वाजता महिला व बाल कल्याण अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे सोबत आढावा बैठक(सर्व बैठका शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे). सोयीनुसार बुलढाणा येथून नागपूरकडे रवाना.

# बुलढाण्यात मंगळवारी पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलडाणा आणि श्री. शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन मंगळवार दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा जि. बुलढाणा येथे करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजकांनी त्यांच्याकडील रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. सदर कार्यालयाकडे नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात नामांकित कंपनी प्रतिनिधींद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेवून त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच नामांकित कंपनीमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी या मेळाव्याद्वारे उपलब्ध होणार आहे.




दहावी, बारावी आयटीआय, पदवीधर पुरुष महिला उमेदवारांनी ४ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा जि. बुलढाणा येथे प्रत्यक्ष उपस्थित राहुन सहभागी होऊन रोजगार प्राप्त करुन घेण्यासाठी संधी उपलब्ध झाली आहे. पात्र, गरजू व नौकरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदाकरीता सुध्दा मुलाखत देऊ शकतात. तरी मेळाव्याच्या ठिकाणी आवश्यक त्या कागदपत्रांसह सकाळी १० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहुन आपली नाव नोंदणी करावी आणि उपस्थित कंपन्याच्या प्रतिनीधी समवेत मुलाखत द्यावी व बुलढाणा जिल्हातील जास्तीत जास्त उमेदवारानी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे. याबाबत काही अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा या कार्यालयाच्या (०७२६२-२४२३४२) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# नॉर्मल डिलिव्हरी साठी जिल्हावासियांची पसंती मिळतेय जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालयला...



## दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा वर्षभरामध्ये सर्वाधिक नॉर्मल डिलिव्हरी करण्याचा रेकॉर्ड...

## जास्तीत जास्त लोकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालयात नॉर्मल डीलिव्हरीला मोठी पसंती मिळते. गेल्या काही वर्षांत येथे नॉर्मल प्रसूतीचे प्रमाण सीझरच्या तुलनेत खूप जास्त असून, सुमारे ८० टक्के प्रसूती नॉर्मल पद्धतीने होतात.

जानेवारी २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या वर्षभराच्या दरम्यान २ हजार ५०८ नॉर्मल डिलिव्हरी या जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये झालेल्या आहे हा आकडा सिजरच्या तुलनेत खूप मोठा आहे. रुग्णालय प्रशासनाच्या माहितीनुसार, सिझर पद्धतीने प्रसूती फक्त गरज पडल्यासच केली जाते. लोक औषधोपचारासाठी आणि नॉर्मल डिलीवरीसाठी अधिकाधिक या जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालयात येत आहेत, ज्यामुळे हे रुग्णालय नेहमीच गजबजलेले असते. नॉर्मल डीलिव्हरीची प्रमुख फायदे म्हणजे रुग्णाला पटकन बरे होण्याची शक्यता, कमी त्रास, कमी संसर्गाचा धोका आणि हॉस्पिटलमध्ये कमी वेळ राहण्याची गरज. त्यामुळे लोकांना नॉर्मल डीलिव्हरीला प्राधान्य देण्याचे कारण आहे.

या रुग्णालयाने सामान्य डीलिव्हरीस प्रोत्साहन देत गेल्यामुळे स्थानिक लोकांमध्ये याची चांगली कल्पना निर्माण झाली आहे आणि ते याला पसंती देत आहेत.थोडक्यात, जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालयात नॉर्मल डीलिव्हरीसाठी लोकांची मोठी पसंती असून, हा एक सकारात्मक आणि प्रसूतीसाठी सुरक्षित




पर्याय म्हणून प्रसिद्ध होत आहे.

गेल्या वर्षभरामध्ये या रुग्णालयामध्ये २ हजार ५०८ या नॉर्मल डिलिव्हरी झाली आहे तर १ हजार ७२० हे सिजर झाले आहे.१५५ हे गर्भपिशवीचे शस्त्रक्रिया झाल्या आहे.तर २६४ कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया झाल्या आहे. इतर २० शस्त्रक्रिया झाल्या आहे. त्यामुळे जिल्हा वासियांची पूर्ण पसंती या जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालयाला मिळत आहे.

## या आहे सोयसुविधा....

गर्भवती महिलांना मिळते सकाळी या ठिकाणी गुळ शेंगदाण्याचे लाडू कडधान्याची उसळ, अंडे फळे इत्यादी. तसेच गर्भवती महिलांची तपासणी व लसीकरण तसेच नवजात अर्भकाचे प्राथमिक लसीकरण प्रसुतीपुर्व व प्रसुतीपश्चात सर्व सेवा उपलब्ध आहे.त्यानंतर रूग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा विनामुल्य उपलब्ध आहे.तसेच गर्भवती महिलांना घरपोच पोहचविण्याकरिता १०२ ॲब्यूलन्स सेवा उपलब्ध आहे.५० पेक्षा जास्त नर्ससेचा स्टाफ या ठिकाणी उपल्बध आहे.२४ तास सेवासाठी तयार आहे.




## मास विक्रेत्यांमधील राडा प्रकरणी आठ जणांवर गुन्हे दाखल

**जनसंचलन/ चिखली**

शहरातील बाजार परिसरात किरकोळ वादातून मास विक्रेत्यांमध्ये ३० ऑक्टोबरच्या दुपारी राडा झाला होता. आठवडी बाजार परिसरातील या घटनेने शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला होता. अखेर वरिष्ठांच्या आदेशाने पोलिसांनी याप्रकरणी रात्री उशीरा आठ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. आठवडी बाजार परिसरातील बोंद्रे पेट्रोल पंप डी.पी. रोड दरम्यान असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा विक्रेत्यांची मोठी रांग आहे. याच विक्रेत्यांच्या दोन गटांत ३० ऑक्टोबरच्या दुपारी १२ वाजताच्या सुमारास वाद उफाळून आला व तुफान राडा घडला होता. दरम्यान घटनेची माहिती मिळताच ठाणेदार संग्राम पाटील चमुसह घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थितीवर वरिष्ठांच्या आदेशाने पोलिसांची कारवाई: रात्री उशिरा आरोपींवर गुन्हे दाखल नियंत्रण मिळविले; मात्र सार्वजनिक ठिकाणी एवढा मोठा राडा होऊनही याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल न झाल्याने पोलिस प्रशासनावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. अखेर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून रात्री उशीरा या प्रकरणी बाबुलॉज चौकीचे पोलिस कॉन्स्टेबल सुधाकर शामराव पाडळेंच्या तक्रारीवरून शेख हनीफ शेख गणी, शेख सद्दाम शेख रहेमान, शेख जावेद शेख सलीम, शेख दानिश शेख आसिफ, शेख इरफान शेख शरीफ, शेख बाबू शेख इरफान शेख सांडू, शेख वाहफ शेख फकीरा, शेख राजू शेख सांडू (सर्व रा. चिखली) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला

## केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांचा एकतेचा संदेश

**जनसंचलन/बुलडाणा**

युवकांनी राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय सहभागी व्हावे. सरदार पटेल यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन भारताच्या एकतेचा आणि स्वावलंबी भविष्यासाठीच्या संकल्पाचा संदेश आत्मसात करावा, असे प्रतिपादन केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या, पदयात्रेचे उद्दिष्ट तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि एकतेचा संदेश पोहोचविणे हे असून, संपूर्ण राज्यात २५ नोव्हेंबरपर्यंत जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर दरम्यान गुजरातमधील करमसदपासून स्टॅच्यू ऑफ युनिटीफ केवडिया येथे राष्ट्रीय पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. या पदयात्रेत उत्स्फुर्तने सहभागी होऊन सरदार पटेल यांच्या कार्य जनसामान्यपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन क्रीडा राज्यमंत्री यांनी केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ङ्क्षसरदार १५० युनिटी मार्चफ्फ अंतर्गत जिल्हास्तरीय पदयात्रेचे आयोजन जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर येथे करण्यात आले होते. या पदयात्रेला केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे व आमदार चैनसुखी संचेती यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. या पदयात्रेत मलकापूरमधील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, युवक संघटना, स्वयंसेवक, एनएसएस, एनसीसी सदस्य, वारकरी मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पदयात्रेदरम्यान भारत माता की जय वंदे मातरम या घोषणांनी वातावरण देशभक्तीने भारून गेले. पदयात्रेचा समारोप मातृ मंडळ, चाळीस बिगा येथे झाला. या वेळी माजी मंत्री एकनाथ खडसे, जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवे उपस्थित होते. मुख्य कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार पटेल यांच्या जीवनावर आधारित पथनाट्य आणि देशभक्तिपर गीत सादर करण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८